REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# भारतातील खेड्यांतील प्रस्थापित व्यवस्था : एक दृष्टिक्षेप



**प्रा. डॉ. डि. एस. आठवले**
**सहा. प्राध्यापाक, राज्यशास्त्र विभाग ,**
**श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महा., दर्यापूर.**

## प्रस्तावना :-

अस्पृश्यतेची दाहकता, अस्पृश्यता हा एक गंभीर प्रश्न आहे, ही सामाजिक विषमतेची बिजे आहेत हे सर्व समजून घेण्यासाठी 'हिंदूंनी प्रस्थापिता केलेली समाजव्यवस्था व तिच्यातील अस्पृश्यांचे स्थान कसे व कोणते हे समजण्याकरिता उत्तम मार्ग म्हणजे हिंदूंच्या खेड्यातील ग्रामपद्धतीचो जीवन होय.

न्यायदान करण्याच्या दृष्टीने प्रत्येक खेड्यात एक पंचायत असे. त्यांची निवड ग्रामवासी करीत असत. जमिनी वाटणी, गावाचे प्रशासन, आर्थिक व्यवहार प्रशासन प्रत्येक खेड्यातील गावाच्या मुखियाच्या द्वारे होत होते. त्याशिवाय प्रत्येक खेड्यात गावकामगार म्हणून कारागीर वर्ग असे त्यात न्हावी, सुतार, लोहार, चांभार, ज्योतिषी, पुजारी हे वर्षभर गावातल्या लोकांची सेवा करत व पूर्वी बलुतेदारीची पद्धती अस्तित्वात होती की, वर्षभर कामे करावयाची व वर्षाच्या शेवटी त्याचा मोबदला वस्तुंच्या रुपात म्हणा किंवा अन्नधान्याच्या रुपात मिळत असे.

अशा खेड्याबरोबरच घेट्टोही होते. खेड्याइतकेच हे घेट्टोही महत्त्वाचे होते. कारण भारतात घेट्टो नसलेले एकही खेडे नव्हते. खेडे हे स्पृश्यांचे होते तर घेट्टो हे अस्पृश्यांचे होते. खेडे व घेट्टो एकमेकांशी संलग्न असायची म्हणजे एकाच समाजव्यवस्थेचे दोन भाग असायचे.

## सामाजिक व्यवस्थेची वैशिष्ट्ये :-

आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे स्पृश्यांचे खेडे तर अस्पृश्यांचा घेट्टो हे खेड्यांपासून एक मैल अंतरावर असायचे. या अस्पृश्यांना खेड्यात येता येत नव्हते तर स्पश्य घेट्टोत जात नव्हते. हिंदूंच्या मंदिरात, विहीरीवरील पाणी, हिंदूंच्या शाळेत प्रवेश इत्यादी बंदीसोबातच अस्पृश्यांची हजामत कोणताही न्हावी करून देत नव्हता ना परिट कपडे धुवून देत नव्हता. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारच्या जमिनीची मालकी नव्हत. तो पूर्णपणे परावलंबी होता, स्पृश्यांच्या मदतीवरच मान्य करणे भाग पडे. मेहरबानी केल्यासारखे श्रमाचा मोबदला त्यांना मिळत असे. कधीकधी जंगलातून गवत आणणे, रोज रात्री स्पृश्य ग्रामवासीयांच्या दारोदार जाऊन अन्नाची भीक मागणे, अशीच रोजची दिनचर्या अस्पृश्यांची होती. भारतातल्या जवळपास सहा कोटी अस्पृश्यांसाठी दररोज स्पृश्यांच्या दारी भीक मागून अन्न मिळवणे हे उपजिविकेचे प्रमुख साधन बनले होते.

प्रस्थापित व्यवस्थेचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्ये असे की, स्पृश्य आणि अस्पृश्य या दोघांचाही दर्जा हा वंशपरंपरागत असायचा त्यात त्याच्या गुणाला, अनुभवाला कोणत्याही प्रकारचा वाव नव्हता. एकदा का तुम्ही अस्पृश्य म्हणून जन्माला आले की, मरेपर्यंत, पिढ्यांपिढ्या तुम्ही अस्पृश्य. ब्राह्मण म्हणून जन्माला आले क, शेवटपर्यंत ब्राह्मण अशी त्रैर्वाणकांचीही अवस्था होती. थोडक्यात सांगायचे झाल्यास प्रस्थापितांची ही विषमतावादी समाजव्यवस्था केवळ नियतीवर आधारित असायची. आणि नियती ही अशी बाब आहे ती चिरंतन आहे, तिच्यामध्ये कधीही बदल होऊ शकत नाही. एखादा अस्पृश्य आपल्यामध्ये गुणाद्वारे कितीही श्रेष्ठ असला तरी नियतीमुळे त्याचा दर्जा नेहमी अवगुणी स्पृश्यांमध्ये खालचाच राहायचा.

## प्रस्थापित व्यवस्थेची प्रमुख वैशिष्ट्ये :-

प्रस्थापित व्यवस्थेच्या प्रमुख वैशिष्ट्यांची चर्चा कीत असतांना आपण आतापर्यंत या व्यवस्थेची साधारणतः तीन वैशिष्ट्ये पाहिली आहेत. एक म्हणजे स्पृश्य आणि अस्पृश्य हे दोन विरूद्ध समुदाय आहेत, दुसरे म्हणजे अस्पृश्यांना आपले उदरनिर्वाह करण्याकरिता सर्वस्वी स्पृश्यांवर अवलंबून राहावे लागे आणि तिसरे म्हणजे त्यांचा दर्जा हा जन्मावर आधारित होता.

याव्यतिरिक्त अस्पृश्य समाजाला आणखी काही वैशिष्ट्यांसह हिंदू समाजाने आपल्या जोखंदळात बांधून ठेवण्याचे चित्र दिसून येते. अस्पृश्यांनी कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या करु नये याला स्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजाने शिक्षेस पात्र ठरविल्या आहे, त्या पुढीलप्रमाणे :

१) अस्पृश्यांनी जमिनी, गोधन यांची मालमत्ता संपादन करु नये.
२) त्यांनी कौलारु घर बांधू नये.
३) त्यांनी स्वच्द कपडे, पायात बूट, हातावर घड्याळ, सोने घालू नये.
४) त्यांनी आपल्या पाल्यांना श्रेष्ठत्वसूचक नाव देणे गुन्हा.
५) अशा समाजाच्या व्यक्तीने घोड्यावर किंवा डोलीत बसू नये.
६) हिंदूना अभिवादन न करणे गुन्हा.
७) अस्पृश्यांनी संस्कृत भाषा बोलू नये.
८) हिंदू व्यक्तींच्या उपस्थितीत खूर्चीवर बसू नये.
९) हिंदूच्या आगेमागे फिरु नये, कारण अस्पृश्यांच्या श्वासोच्छावासाने हवा दुषीत होते.

अस्पृश्यांच्या हातून वरिलपैकी कोणत्याही गुन्ह्याचा भंग झाला तर त्याला हमखास शिक्षा होत होती. परंतु ती शिक्षा मात्र वैयक्तिक स्वरुपाची न राहता सामुहिक स्वरुपाची असायची. याचे उदाहरणे किंवा संदर्भ आपण विविध ठिकाणच्या घटनावरून पाहिलेलेच आहे. अशी ही प्रस्थापित व्यवस्था अस्पृश्य समाजाला स्पृश्य हिंदूशी घट्ट जखडून ठेवणारी होती. या प्रस्थापित व्यवस्थेची अनन्यसाधारण काही आणखी वैशिष्ट्ये आहेत.

१. अस्पृश्य हे जन्मत:च हलक्या दर्जाचे व शेवटपर्यंत तसेच राहतात.
२. अस्पृश्य हे वयाने किंवा गुणवत्तेने श्रेष्ठ असले तरी दर्जात फरक नाही.
३. अस्पृश्याने आपल्या नशिबी असेच आहे, असे समजूनच वागावे.
४. अस्पृश्यांना स्पृश्यांच्याविरूद्ध दाद मागण्याचा, अन्यायचा प्रतिकार करण्याचा कोणताही अधिकार नाही.

**प्रस्थापित व्यवस्था अजुनही टिकून आहे :-**

उदयपूरच्या अस्पृश्यांच्या दुरावस्थेचे वर्णन १५ फेब्रुवारी १९४५ रोजी हिंदूस्थान टाईम्स मध्ये आलेले होते. तीच प्रस्थापित व्यवस्था आजही जशीच्या तशी किंबहूना त्याहीपेक्षा जास्त प्रभावी कार्यक्षम असल्याचे जाणवते. त्यामधील मजकूर असा की, 'अस्पृश्य मंदिरात प्रवेश करू शकत नाहीत, सार्वजनिक विहीरीवर पाणी भरू शकत नाहीत, सण आणि उत्सवप्रसंगी सवर्ण हिंदूमध्ये मिसळता येत नाही. रथयात्रा किंवा ढोल मिरवणूका वेगळ्या रस्त्यांनी नेणे, जेवणात गुळ आणि लोणी घेण्यास मनाई, शाळांत किंवा इतर ठिकाणी अस्पृश्यांची मुले हिंदूंच्या मुलांबरोबर बसू शकत नाही, अंगावर घालण्याचा कपड्यांची निवड करण्याचा अधिकार नाही, घोड्यावर स्वार होऊन गावातून जाऊ शकत नाहीत, सार्वजनिक वाहनात त्यांना प्रवेशबंदी होती. तशीच अवस्था मेवाड संस्थानातील अस्पृश्यांची सुद्धा होती. हिंदूस्थान टाईम्सच्या ८ मार्च १९४५ च्या अंकात तसे निवेदन प्रसिद्ध झाले आहेत. यामध्ये हरिजनांवर लादण्यात येणाऱ्या अपात्रतेंचे आणि त्यांच्या परिणामी हरिजनांना भोगाव्या लागणाऱ्या यातनांचे वर्णन त्यात केलेले आहे. हिंदूंच्या पुराणमतवादी व पुर्वग्रहदुषितांमुळे अस्पृश्यांचे नागरी व मानवी हक्क हिंदूंनी हिरावून घेतले होते.

**वर्णव्यवस्थेची समिक्षा :-**

चातुर्वण्य व्यवस्था, जातीव्यवस्था व वर्णव्यवस्थेची समिक्षा 'शुद्र पूर्वी कोण होते' या ग्रंथात त्यांनी विस्तृतपणे केली आहे. शुद्राची उत्पत्ती कशी झाली सांगतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, "पूर्वी भारतीय समाजात केवळ तीनच वर्ण अस्वित्वात होते. परंतु पुढे ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यात संघर्ष होऊन क्षत्रियांनी ब्राह्मणांचे वर्चस्व मान्य केले नाही म्हणून त्या क्षत्रियांचे उपनयन करण्याचा ब्राह्मणांनी नकार दिला. ज्या क्षत्रियांचे उपनयन होवू शकले नाही ते वर्णव्यवस्थेत दुसऱ्या क्रमांकावरून खाली एकदम शुद्र अशा चौथ्या वर्गात / वर्णात ढकलले गेले. पुढे अशा पुर्वाश्रमीच्या क्षत्रियांचा समावेश शुद्रात झाल्यामुळे अनेक बंधने त्यांच्यावर लादल्या गेली.

अस्पृश्यतेविषयी डॉ. आंबेडकरांचे संशोधन अतिशय मौलीक आहे. त्यांच्या मते, "अस्पृश्यातेला वांशिक अथवा व्यावसायकि पाया नाही. जे समुदाय बौद्धधर्मीय होते त्यांचा ब्राह्मणांनी द्वेष केल्यामुळे आणि ज्या काळात हिंदू समाजाने गोमांस खाणे बंद केले त्यानंतरही या बौद्धधर्मीयांनी गोमांस खाणे चालू ठेवल्यामुळे त्यांना अस्पृश्य केले. ही अस्पृश्यता इ.स. ४०० च्या आसपास रुढ झाली असावी.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिभेद निर्मूलन या ग्रंथात नमुद केले की, हिंदूमधील विघटन आणि पतनाचे मूळ कारण जर कोणते असेल तर ते जातिव्यवस्था आहे. जातिव्यवस्था हे झाड असून जाती या त्यांच्या फांद्या आहेत. पोटजाती त्यांची पाने आहेत. फांद्या आणि पाने कापुन जातिभेद नष्ट होणार नाही, तर मुळासकटच झाड कापले पाहिजे आणि त्यासाठी जाती निर्मूलनाचा कायदा बनवला पाहिजे, असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता.



LBP PUBLICATION

हिंदू धर्माची रचना सांगताना डॉ. आंबेडकर म्हणतात की, "या धर्माची रचना ही वर्गाच्या कल्पनेवर आधारित आहे. हिंदू धर्म एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीशी कसे वागावे हे सांगत नसून एका वर्गाने दुसऱ्या वर्गांशी कसे वागावे हे सांगतो. एकाला अज्ञानात ठेवतो तर दुसऱ्याला ज्ञान देतो तो धर्म असू शकत नाही, तो एक बौद्धिक गुलामगिरीत ठेवण्याचा एक डाव आहे.

राष्ट्राचे अध:पतन होण्यास व सामाजिक पतन होण्यास हिंदू धर्म कारणीभूत आहे कारण त्या समाजाची रचना ही चातुवर्ण्यव्यवस्थेवर आधारित आहे. चातुवर्ण्य हे विषमतायुक्त असल्याने हिंदू समाज/धर्म इतर देशातील समाजाच्या मानाने खूप मागे राहीला आहे. कारण पाश्चिमात्य देशातही गुलामगिरी व खालचा वर्ग होता परंतु त्यांनी त्याला धार्मिक अधिष्ठान प्राप्त होऊ दिले नाही. भारतातील हिंदू समाजात याऊलट स्थिती होती. गुलाम/दास, अस्पृश्य ह्या बाबींना हिंदू धर्माशी जोडल्यामुळे भारतातील अस्पृश्यता हजारो वर्षांपासून एक कलंक म्हणून कायम आहे.

वर्ग जात पद्धती या वैशिष्ट्यांविषयी डॉ. आंबेडकरांचे मत फार कठोर होते. "हिंदू जात म्हणजे खरोखर वर्ग होय आणि जातींची जागरुकता म्हणजे वर्ग जागरूकता होय, याबद्दल शंका शिल्लक नाही.

हिंदू समाजव्यवस्थेएवढी विकृत व अनिष्ठ व्यवस्था जगाच्या पाठीवर कुठेही दृष्टीस पडणार नाही अशी ही व्यवस्था आहे. आर्यांच्या भारतातीलआगमनानंतर भारतात कुठेही जातींचा प्रकार अस्तित्वात नव्हता. फक्त तीन वर्ष त्यावेळी अस्तित्वात होते. भारतातील मूळ आर्यांना जिंकल्यानंतर त्यांनी त्यांना शुद्र बनविले  व आर्यांच्या वर्णव्यवस्थेत विरोध करणाऱ्यांना त्यांनी व्यवस्थेबाहेर फेकले. पुढे विविध क्रिया-प्रक्रियांमधून अनेक जातींची निर्मिती झाली व पाचवा वर्ण-अतिशुद्र निर्माण झाला. ह्या अतिशुद्रांनाच पुढे अस्पृश्य या नावे ओळखल्या जावू लागले.

भारतीयांनी जातिव्यवस्थेने असंख्य अशा श्रेणीबद्ध कप्प्यांमध्ये बंदिस्त ठेवले. शेकडो वर्षात अनेक सत्तांतरे झाली, परिवर्तन झाले परंतु जातिव्यवस्थेची ही पोलादी चौकट मात्र कमी न होता घट्ट झाली कारण जातिव्यवस्थेच्या नियमाचा आदर करण्याची तरतूदच मुळात हिंदू धर्मग्रंथात केली गेली. या जातिव्यवस्थेच्या नियमाचे संचालन करण्याची जबाबदारी, अधिकार धर्मगुरूंना असल्याने त्यांनी त्याची अंमलबजावणी अधिक कठोर बनविली आणि ही रचना तयार करण्यात ब्राह्मण जात शिरोभागी होती. ज्यांचा स्पर्श किंवा ज्यांची सावली पडण्यानेही अशुद्धता होती असे शुद्र वर्णाच्या तळाशी होते. ज्या जातीय व्यक्तीने जन्म घेतला त्यावरूनच समाजातील त्याचे स्थान निश्चित होत असे. तुमच्या अंगभुत गुणांना, कर्तव्याला कोणतेही स्थान नव्हते.

बिनदिक्कतपणे अस्पृश्यता ही जातिव्यवस्थेची अतिशय अंधकारमय बाजू आहे. त्याचप्रमाणे, "अस्पृश्यता ही जातिव्यवस्थेची अतिरिक्त फलनिष्पत्ती आहे. हिंदू समाजाने किंवा समाजव्यवस्थेने शुद्रांचे पतन अमानवी, निकृष्ट व दळभद्री करून त्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार बहाल केले नाहीत जेणेकरून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येता येऊ नये, हे सर्व त्यांनी आपल्या वैयक्तिक स्वार्थासाठी केलेले दिसते. जातिव्यवस्थेच्या नियमानुसार शुद्रांना गावकुसाबाहेरच राहावे लागे. त्यांना मैल साफ करणे, गलीच्छ श्रम करणे, कामाचा मोबदला न मागणे, आणि सवर्ण सांगतील अशी कोणत्याही प्रकारची कामे करने. न केल्यास आज्ञा न पाळल्यास कठोर शिक्षेलाही त्यांना सामोरं जावं लागे.

ब्रिटीशांचे भारतात आगमन होईपर्यंत काही फरकाने म्हणा की, जातिव्यवस्था आणि अपृश्यतेचा भारतावर लागलेला कलंक कायम होता परंतु १८ व्या शतकात पेशवाईच्या राजवटीत तर अस्पृश्यांची स्थिती अधिक दयनीय झाली होती. त्यांच्या दु:खाला पारावार राहिली नव्हती. स्थानिक पातळीवर जातिनियमांची आणि शुद्रतेची अंमलबजावणी जहागीरदार, संरजामदार अधिक काटेकोरपणे करीत होते.

हिंदू समाजव्यवस्था ही जातींची शिडी असून एका जातिच्यावर दुसरी जात असून चढत्या क्रमाने द्वेष अभिव्यक्त होतो. तर उतरल्या क्रमाने तिरस्कार. कारण प्रजापतीच्या मुखातून ब्राह्मण, बाहुतून क्षत्रिय, मांडीतून वैश्य तर पायातून शुद्र निर्माण झाले. जातीच्या या परंपरेत सर्वात वरच्या स्थानी उच्च जात, सर्वात खाली असलेली कनिष्ठ जात होय. व्यक्तींचा दर्जा हा तिच्या जन्मावरून ठरविल्या जात असे. ती ज्या जातीत, धर्मात जन्माला आली त्यावरून तीची ओळख असे. विषमता हा हिंदू धर्माचा आत्मा असल्यामुळे समाजाचे या जातिव्यवस्थेमुळे विभाजन झाले व तो समाज दुभंगला गेला. समाज या अर्थाने हिंदू समाज हा समाज नूसन तो अनेक जाती-पोटजातींचा एक संग्रह आहे, असे व्यवस्थेचे लक्षणे डॉ. आंबेडकरांनी हिंदू समाजव्यवस्थेचे केले आहे.

हिंदू समाजव्यवस्थेच्या विषमतावादी जातीय, व्यवस्थेचा दुष्परिणामाबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात की, जातीनो जनचैतन्य, परोपकाराची भावना, आपुलकीची भावना, समानतेची भावना नष्ट केली. हिंदुची जात म्हणजे वर्गाची जात होय. डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्य निर्मूलनाकरिता अस्पृश्यांना त्यांच्या समाजाच्या पतनाची जाणीव करून देणे, त्यांच्यात आत्माभिमान जागृत करणे, आणि आपल्या अधिकारासाठी लढण्यास संघर्षाची भूमिकेसाठी प्रवृत्त करणे हे त्यांचे मुख्य सूत्र होते. अस्पृश्यतेत सवर्ण हिंदूचे आर्थिक-सामाजिक व इतर प्रकारचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे त्यांचा विवेकबुद्धी ठिकाणावर येईल हा अस्पृश्यांना सामाजिक न्याय मिळेल अशी अपेक्षा त्यांच्याकडून करणे, व्यर्थ असल्याचे मत डॉ. आंबेडकर मांडतात.

## निष्कर्ष :-

स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या त्रिसुत्रीवरच समाजजीवनातील व्यक्तींचा विकास होत असतो. व्यक्तीच्या सर्वांगिण विकासमुक्त समाजाचे ध्येय असायला पाहिजे. व्यक्तींच्या वरचे स्थान समाजाचे असून नये, असे मत व्यक्ती-व्यक्तींसाठी डॉ. आंबेडकरांचे होते.

**संदर्भ सूची :-**

१. Bailly, Kenneth; Methods of Social Research, Oxford University Press, Bombay, १९६५.
२. Dhongade R. V., New Oxford English Marathi Dictionary, S. Chand and Company (Pvt. Ltd.) New Delhi, १९८७.
३. बेहरे, सुमन, सामाजिक संशोधन पद्धती, विद्या प्रकाशन, नागपूर, २००४.
४. आगलावे, डॉ. प्रदिप, अभिजात समाजशास्त्रीय विचार, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७
५. पाटील, शरद, मार्क्सवाद फुले आंबेडकरवाद, सुगावा प्रकाशन, पुणे, २०१०


LBP PUBLICATION